**ठळक बातम्या**

- कारकिर्द आणि व्यवसायासाठी क्रीडा क्षेत्र हा देशात उत्तम पर्याय म्हणून समोर आल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- प्रसादाची शुद्धता जपण्याचं मुख्यमंत्र्यांचं गणेश मंडळांना आवाहन

- मराठी शिकण्यासाठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना वर्षभराची मुदतवाढ

- नेपाळ महापुरातल्या मृतांची संख्या ३५९ वर, राज्यातले ११४ पर्यटक अडकले

- नारळी पौर्णिमेचा सण पारंपरिक पद्धतीनं साजरा करण्याची लगबग

**आणि**

- भारताविरुद्धचा दुसरा कसोटी सामना अनिर्णित राखण्यात श्रीलंकेला यश

**<><><><><>**

भारतात आज क्रीडाक्षेत्र, कारकीर्द घडवण्यासाठीचा एक उत्तम पर्याय आणि व्यवसाय म्हणून उदयाला आलं आहे. त्यामुळे लहान मुलांचा खेळाविषयीचा कल आणि कोणत्या खेळासाठी ते मूल सर्वोत्तम आहे, याचा शोध घेण्यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. ते आज खेलो इंडिया संवाद या कार्यक्रमाला दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करत होते. खेलो इंडिया संवाद हा केवळ खेळांवर चर्चा करण्याचा कार्यक्रम नसून इथली प्रत्येक कल्पना देशाच्या क्रीडा विषयक दृष्टिकोनाला नवी दिशा देऊ शकेल, असं मोदी म्हणाले.

**होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री**

या कार्यक्रमात सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या प्रत्येक जिल्ह्यातल्या दोन महाविद्यालयांमधले तरुण सहभागी झाले होते.

**<><><><><>**

गणेश मंडळांनी प्रसादाची शुद्धता जपावी, त्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाच्या नियमांचं काटेकोरपणे पालन करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे.

ते आज गणेशोत्सवा निमित्त कायदा आणि सुव्यवस्थेसंदर्भात मुंबईत आयोजित बैठकीत बोलत होते. सार्वजनिक गणेशोत्सवात मंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रसादासंदर्भात अन्न आणि औषध प्रशासनाच्या नियमांची माहिती करून घ्यावी. त्यासाठी मंडळांनी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करावा, असं ते म्हणाले.

फटाके, लाऊडस्पिकर आदींच्या वापरात होणाऱ्या नियमभंगाच्या प्रकारांवर पोलिसांनी लक्ष ठेवून संबंधितांवर कठोर कारवाई करावी. गणेशोत्सवाचं पावित्र्य आणि शिस्त कायम राखणं ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचं त्यांनी सांगितलं.

गणेशोत्सव उत्साह, शिस्त आणि सलोख्याच्या वातावरणात पार पाडण्यासाठी शासन, प्रशासन आणि गणेशोत्सव मंडळांनी समन्वयानं काम करावं, असं आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

राज्यातल्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी १ वर्षाची मुदतवाढ राज्य सरकारनं दिली आहे. ऑटो टॅक्सी चालक संघटनेनं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची भेट घेतली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. या काळात चालकांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही, असं त्यांनी सांगितलं.

**देवेंद्र फडनवीस बाईट**

MPSC चा औषध निरीक्षक पदासाठीचा पेपर मोठ्या प्रमाणात फुटला नसून एका विशिष्ट व्यक्तीकडे तो पेपर गेला आहे. तरीही पारदर्शकतेसाठी MPSCनं  परिक्षा रद्द केली आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. याप्रकरणी आरोपी कोणत्याही पक्षाचे असले तरी त्यांच्यावर कारवाई होईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या बहुतांश मागण्या मान्य केल्या आहेत. त्यातल्या तांत्रिक स्वरुपाच्या मागण्यांविषयी संबंधित विभागांशी समन्वय साधला जाईल, असं आश्वासन राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी दिलं. पुण्यातल्या मांजरी वसतिगृहात सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थी आंदोलनाला भेट दिल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबत शासन सकारात्मक असून, त्यांच्या मागण्या निश्चितपणे सोडवल्या जातील, असं ते म्हणाले. तर, आपल्या मागण्यांविषयी ठोस उपाय करून

त्याविषयी लेखी आश्वासन दिल्यानंतरच आंदोलन मागं घेतलं जाईल, असं आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

देशात कांद्याचा पुरेसा साठा उपलब्ध असून दलालांमुळं काही ठिकाणी कांद्याची कमतरता आणि दरवाढ झाली असल्याची शक्यता केंद्रीय ग्राहक व्यवहार सचिव निधी खरे यांनी व्यक्त केली आहे. त्या आज नवी दिल्लीत ३५ रुपये किलो दरानं कांदा विक्रीची सुरुवात केल्यानंतर बोलत होत्या.

**होल्ड - निधी खरे**

लवकरच इतर शहरांमध्येही अशा प्रकारे कांदा उपलब्ध करुन दिला जाईल, असं त्या म्हणाल्या. रेल्वेसह रस्ते मार्गाने कांदा मागवला जातो आहे, निर्यातही गेल्यावर्षीच्या तुलनेत नियमित आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नेपाळमध्ये महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ३५९ वर पोहोचली आहे तर आणखी हजारो जण अद्याप बेपत्ता आहेत. नेपाळमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांचा शोध घेऊन त्यांना मायदेशी आणण्यासाठी केंद्र सरकारनं आपले प्रयत्न गतिमान केले आहेत. पूरग्रस्त भागातली संचार व्यवस्था अद्याप विस्कळीत असून नेपाळला गेलेल्या २८८ भारतीयांशी संपर्क होत नसल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायस्वाल यांनी दिली. यात त्रिशूली विद्युत प्रकल्पावर काम करणाऱ्या ७३ भारतीयांचा समावेश आहे. काठमांडूमधला भारतीय दूतावास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या संपर्कात असल्याचं त्यांनी सांगितलं. पुरामुळे चीनमध्ये २०० भारतीय अडकले असून त्यांना सुरक्षित स्थळी नेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

नेपाळमधे महाराष्ट्रातले ११४ पर्यटक अडकले असून त्यापैकी ५३ जण सुरक्षित असल्याची माहिती मिळाल्याचं राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी सांगितलं.

महापुरानं तडाखा दिलेल्या नेपाळच्या सहाय्यासाठी भारतानं ४७ टनांहून अधिक मदतसामुग्री रवाना केली आहे. बचावकार्य अधिक प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीनं भारत काही बेली पद्धतीचे पूल बांधून देणार आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
ऑगस्ट २०२६ - वार

<><><><>

श्रावण पौर्णिमा म्हणजेच नारळी पौर्णिमेचा सण आज राज्याच्या किनारपट्टी भागात साजरा होत आहे. पावसाळ्यामुळे मासेमारी बंद करुन बंदरात नांगरलेल्या होड्या या दिवशी पुन्हा समुद्रात लोटल्या जातात. त्यामुळे किनारपट्टीवरच्या विशेषतः मच्छिमार समाजात या दिवसाला खूप महत्त्व आहे. मुंबईतल्या विविध कोळीवाड्यांमधे जत्रा भरल्या आहेत. समुद्राला नारळ अर्पण करुन, शांत होण्याची प्रार्थना केली जात आहेत. अनेक ठिकाणी पारंपरिक पद्धतीनं नारळ फोडीच्या स्पर्धाही झाल्या.

<><><><>

रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला वाहतुकीच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना दंड ठोठावण्याऐवजी महिला वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या हातावर राखी बांधत ठाणे वाहतूक पोलिसांनी सुरक्षित वाहतुकीचा संदेश दिला. विनाहेल्मेट दुचाकीस्वारांना देखील राखी बांधून मोफत हेल्मेटचेही वाटप करण्यात आलं.

<><><><>

चंद्रपूरमधे, कोणतीही परीक्षा न देता ५ ते १० लाख रुपयांत सहा नामांकित विद्यापीठांच्या विविध शाखाच्या पदव्या आणि पदविकांची विक्री केली जात असल्याचं उघडकीला आलं आहे. याप्रकरणी दुर्गापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे रॅकेट चालवणारा मुख्य आरोपी परिमल बाबूराव गौरकर हा फरार आहे. तर कागदपत्रासाठी ग्राहक शोधणारा वैभव सोनुले याला दुर्गापूर पोलिसांनी अटक केली आहे.

<><><><>

कोलंबोत झालेल्या, भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात आज पाचव्या आणि शेवटच्या दिवशी श्रीलंकेनं दमदार फलंदाजी करत सामना अनिर्णित ठेवण्यात यश मिळवलं.

कालच्या २९० धावसंख्येवरुन आज एस दिनुषा आणि के नुवांता या जोडीनं खेळ सुरु केला आणि ७व्या गड्यासाठी ११२ धावांची भागिदारी करत धावसंख्या ३३० वर नेली. सोनल दिनुषानं नाबाद १३३ धावा केल्या. पसिंदु सूरियाबंदरानं ९२, तर केशरा नुवंतानं ४६ धावांचं योगदान दिलं. त्यामुळे दिवसअखेर श्रीलंकेला ९ गडी गमावून ४२९ धावा करता आल्या. भारतातर्फे मानव सुतार आणि रविंद्र जडेजा यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले.

दोन्ही डावात शतकं झळकावणारा सोनल दिनुषा सामन्यातला सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला.

या मालिकेतला पहिला सामना भारतानं जिंकला असल्यानं ही मालिकाही भारतानं १-० अशी जिंकली.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकण, आणि विदर्भात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस  पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//